महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ७६ वी बैठक

| बैठक दिनांक | दिनांकः- २०-०१-२०२३ |
|---|---|
| ठिकाण | मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधीनी, जालना रोड, औरंगाबाद |
| वेळ | दुपारी ०३.०० वाजता |

# बैठकीचे इतिवृत्त

**विषय क्रमांक. १: -** सन्माननीय सदस्यांच्या रजेबाबत.

**ठराव क्रमांक. १: -** श्री. सन्माननीय सदस्य श्री. फारुख शाह, विधानसभा सदस्य यांची रजा मंजूर करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक.२: -** दिनांक ११.१२.२०२२ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

**ठराव क्रमांक. २: -** दिनांक ११.१२.२०२२ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

## (नोंदणी विभाग)

**विषय क्रमांक ३:-** वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार नोंदणी प्रस्तावांना मान्यता देणे बाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या नोंदणीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण (५१) प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | File No. | Name of Waqf Institute | Address | Village | Talluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ABD/616/ 2017 | Madina Masjid | | Karkin | Paithan | Aurangabad |
| 2 | ABD/535/ 2017 | Noorani masjid | At. Karkin | Karkin | Paithan | Aurangabad |
| 3 | ABD/899/ 2018 | Noorani Masjid Madarsa | At. Pimpalwadi | Pimpalwadi | Paithan | Aurangabad |
| 4 | ABD/456/ 2019 | Madarsa Arbiya Talimudin -wo- Masjid | S.7/1 Plot No 49. 41/1 | Sillod | Sillod | Aurangabad |
| 5 | ABD/75/2 020 | Quraish Masjid | At. City Survey No. 17682/1, Silli Khana | Aurangabad | Aurangabad | Aurangabad |

| Sr. No. | File No. | Name of Waqf Institute | Address | Village | Talluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | ABD/131/ 2022 | Ayesha Masjid | Silk Mill Colony | Aurangabad | Aurangabad | Aurangabad |
| 7 | ABD/253/ 2022 | Bismilla Masjid va Madarsa | At. Property No. 1041 | Pimpalwadi (Pirachi) | Paithan | Aurangabad |
| 8 | ABD/351/ 2022 | Ahle Sunnat Wal jamat Sunni Hanfi Barelvi maslake Ala Hazrat Masjid-e-Akhtar Raza and Madarsa | At. Ibrahim Shah Colony, New Pahadsinghpura | Aurangabad | Aurangabad | Aurangabad |
| 9 | ABD/582/ 2022 | Masjid Urdu Madarsa | Gutt No. 129, Plot No. 42,43,68,69, Pangra | Chitegaon | Paithan | Aurangabad |
| 10 | ABD/900/ 2022 | Muslim Kabrastan | | Ghosala | Soyegaon | Aurangabad |
| 11 | JLN/956/2 022 | Mohammadiya Muslim Kabrastan | -- | Mandeolgaon | Badnapur | Jalna |
| 12 | JLN/957/2 022 | Ayesha Anjum Arbic Madarsa Or Masjid | | Mandeolgaon | Badnapur | Jalna |
| 13 | NDD/410/ 2021 | Rahemaniya Masjid Arbi Madarsa Ahele Sunnatul Jamat | At. Dulhe Shah Raheman Waghi Road | Nanded | Nanded | Nanded |
| 14 | LTR/936/2 017 | Sarvajanik Muslim Idgah | | Chandeshwar | Latur | Latur |
| 15. | LTR/507/2 019 | Masjid-e-Mohammadiya | Kapda Mill, Bodhe Nagr | Latur | Latur | Latur |
| 16 | LTR/84/20 21 | Masjid E Inamul Hasan | Mussa Nagar | Udgir | Udgir | Latur |
| 17 | LTR/85/20 21 | Masjide Kutbe Deccan | Peth Darwaza, Bagbandi | Udgir | Udgir | Latur |
| 18 | LTR/86/20 21 | Masjid E Suffa | Somnathpur Road | Udgir | Udgir | Latur |
| 19 | LTR/487/2 021 | Masjid-E-Sabireen | Al-Amin Nagar, Jalkot Road | Udgir | Udgir | Latur |
| 20 | LTR/616/2 022 | Masjid Hasnain | Mogha | Mogha | Udgir | Latur |
| 21 | THN/35/2 021 | Sher -E- Raza Masjid and Madarsa | 613 IV Nizampura Mastim Appt Hazi Compound V.P. Naka | Bhiwandi | Bhiwandi | Thane |
| 22 | PUN/186/ 2022 | Hazrat Peer Shaikh Sarwar Shaikh Umar Dargah Masjid Trust | (Sawante Wadi) | Gojubavi | Baramati | Pune |

| Sr. No. | File No. | Name of Waqf Institute | Address | Village | Talluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 23 | PUN/1136 /2022 | Hazrat Peer Makbool Hussain Madani Kadari R.A. | At. Shaniwar Peth | Pune | Pune | Pune |
| 24 | STR/589/2 021 | Noor Arbi Madarsa Masjid | | Jakatwadi | Satara | Satara |
| 25 | STR/507/2 022 | Madina Masjid | | Nhavi bk | Koregaon | Satara |
| 26 | KPR/555/ 2021 | Madina Masjid Trust & Madarsa | At. Aadinath Nagar, A Ward | Karvir | Karvir | Kolhapur |
| 27 | KPR/579/ 2021 | Jama Masjid Bhadgaon | At. Patil Wada Road | Bhadgaon | Gadhinglaj | Kolhapur |
| 28 | SLR/918/2 018 | Madina Masjid | At.Sarjapur | Sarjapur | Barshi | Solapur |
| 29 | SLR/266/2 021 | Jumma Masjid (Jama Masjid), Kabrastan, Idgah Trust | At. Dudhani (Gramin) | Dudhani | Akkalkot | Solapur |
| 30 | SLR/614/2 021 | Muslim Jamat Kabrastan | | Wagdari | Akkalkot | Solapur |
| 31 | SLR/71/20 22 | Jama Masjid Va Arbi Madarsa | at Gulpoli | Gulpoli | Barshi | Solapur |
| 32 | SLR/749/2 022 | Nalehaider Baraimam Dargah (Ashoorkhana ) | Chungi | Chungi | Akkalkot | Solapur |
| 33 | NSK/220/ 2022 | Masjid Ahelesunnat Bibi Fatima Raziallahu | at S. No. 412/ Block No. A11, Hari Om HSG, Society, Jail Road | Dasak | Nashik | Nashik |
| 34 | NSK/339/ 2022 | Madarsa-wo-Masjid Batool Ibrahim | At. Survey No. 98/1 Plot No. 34, Gulshane Ameen, Gulab Park | Malegaon | Malegaon | Nashik |
| 35 | NSK/1107 /2022 | Ayesha Masjid and Takiya Kabrastan Wakf | | Wadner Bhairao | Chandwad | Nashik |
| 36 | JGN/544/ 2021 | Masjide Al-Mohsin | At. Khadka Road | Bhusawal | Bhusawal | Jalgaon |
| 37 | JGN/14/2 022 | Nurani Masjid Trust | | Bhokari | Pachora | Jalgaon |
| 38 | JGN/592/ 2022 | Muslim Punch Kabrastan and Eidgah | -- | Sonwad Bk. | Dharangaon | Jalgaon |
| 39 | AMT/72/2 022 | Dargah Hazrat Mastan Shah Moti Shah Miyan (R.A.) | At. Dulha Gate | Achalpur | Achalpur | Amravati |

| Sr. No. | File No. | Name of Waqf Institute | Address | Village | Talluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 40 | AKL/772/2016 | Noor Arbi Madarasa O Noor Masjid | Ghodegaon | Ghodegaon | Telhara | Akola |
| 41 | AKL/642/2017 | Masjid-E-Abubakar | Telephone Colony, Station Area. | Murtizapur | Murtizapur | Akola |
| 42 | AKL/73/2020 | Madina Masjid-o-Madarsa | | Sirsoli | Telhara | Akola |
| 43 | AKL/21/2021 | Niyojit, Madarsa Darul Uloom Abubakar Siddique (R.A.) | Aazampura | Kasarkhed | Balapur | Akola |
| 44 | AKL/335/2022 | Noorul Islam Masjid Va Madarsa | -- | Asegaon Bajar | Akot | Akola |
| 45 | AKL/500/2022 | Masjid Hazrat Inamul Hasan Sansthan | | Wadegaon | Balapur | Akola |
| 46 | BLD/104/2020 | Masjid Hazrat Umar Farooque | Azad nagar alasna Road | Shegaon | Shegaon | Buldhana |
| 47 | BLD/267/2021 | Mohammadiya Masjid and Arbi Madarsa | Kadamapur | Kadamapur | Khamgaon | Buldhana |
| 48 | WSM/465/2022 | Maktab Wa Masjid-E-Rashidiya | at Eidgah Nagar | Washim | Washim | Washim |
| 49 | WSM/981/2022 | Abubakar Masjid wo Madarsa | Ward No.02 Shirpur | Shirpur | Malegaon | Washim |
| 50 | WRD/335/2021 | Ahle Sunnat Wal Jamat Muslim Qabrastan and Idgah | | Seloo | Seloo | Wardha |
| 51 | WRD/598/2021 | Subhaniya Arbi Madarsa and Masjid Ahle Sunnat Wal Jamat | | Sevagram | Wardha | Wardha |

**ठराव क्रमांक ३:-**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार उपरोक्त एकुण (५१) नोंदणी च्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (५१) नोंदणीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे.

## (चौकशी विभाग)

**विषय क्रमांक. ४: - वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(ए) नुसार योजना मंजूरीसाठीच्या प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या योजना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

| Sr No. | File No | District | Name Of Institution |
|---|---|---|---|
| 1. | 69/298/2022 | Nanded | Masjid-E-Ahmadiya & Madarsa Talimul Quraan , Mill Gate, Nanded |
| 2. | 69/276/2016 | Nashik | Hazrat Sayyed Abdul Rahman Urf Jalal Shah Baba Dargah & Ibadatgah Deolali , Tq. Dist Nashik |

**ठराव क्रमांक ४:-**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार उपरोक्त व्यवस्थापन योजनाच्या प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (२) योजनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक. ५: -** वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फा संस्थांच्या बदलाबाबत प्रस्तावांना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | File No. | District | Name of Waqf Institution | If Any case pending in the court Yes/No | Any court order Yes/No |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 42/145/2021 | Mumbai | Sunni Chishtiya Masjid Ahle Sunnat wal Jamat (Block MMRDA colony, Kadri Nagar, Wadala, Antop hill Wadala, Mumbai | No. | No |
| 2. | 42/294/2020 | Satara | Shahi Wakf Kabrastan, Iadgah Trust, at Karad Tq. Karad Dist Satara | No | No |
| 3. | 42/337/2017<br>42/422/2017<br>42/443/2018 | Ahmednagar | Jama Masjid Taklibhan Tq. Shrirampur Dist Ahmednagar | No | No |
| 4. | 42/293/2016<br>42/308/2020 | Aurangabad | Idgah Masjid and Deeni Darasgah , Kannad Dist Aurangabad | No | No |
| 5. | 42/366/2021 | Buldhana | Kacchi Nagina Masjid Sansthan, Malkapur Dist Buldhana | No | No |
| 6. | 42/493/2021 | Pune | B. K. Quresh Jamat and Masjid Trust, 908, Bhavani Peth, Pune | No | No |

**ठराव क्रमांक. ५: -**

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्राप्त झालेल्या उपरोक्त प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त अ. क्र. ५ वगळता उर्वरीत एकुण (५) प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ६:-** **वक्फ संस्था जामा मस्जिद व मुस्लमानांचे कब्रस्तान, मु.पो, परतवली, मौजे. परतवली, ता. राजापुर, जि. रत्नागिरीच्या योजना आदेश पारित दि. २७/०५/२०१९ या वक्फ संस्थेच्या पारीत योजनावर फेर विचार करणे बाबत.**

वक्फ संस्था जामा मस्जिद व मुस्लमानांचे कब्रस्तान, मु.पो, परतवली, मौजे. परतवली, ता. राजापुर, जि. रत्नागिरी हि वक्फ सस्था वक्फ मंडळात वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. श्री. अब्दुल अजीज अब्दुल रहेमान वाघु व इतर, रा. बी-४०५, परीजत अपार्टमेंट, सागर टॉवर लाईन, फेअरडिल रोड जोगेश्वरी पश्चिम, जि. मुंबई यांनी दि. १३/१०/२०१६ रोजी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये या कार्यालयात योजना अर्ज मंजुर करण्यासाठी दाखल केली.

दि. २१/०३/२०१७ रोजी दाखल योजनावर या कार्यालयाने जाहीर प्रगटन निर्गमीत करुन दाखल योजनावर कोणास काही हरकत/आक्षेप/तक्रार उजर असल्यास त्यांना या कार्यालयात आपेल उजर आक्षेप दाखल करावे. सदर नोटीस अर्जदारांनी रत्नागिरी ऍक्सप्रेस या वृतपत्रात दि. ०२/०४/२०१७ रोजी प्रसिध्द केले. जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यानंतर दि. १६/१०/२०१७ रोजी प्रादेशिक वक्फ अधिकारी कोकण विभाग मुंबई, यांनी स्थळ पाहणी पंचनामा करून खालील प्रमाणे अहवाल कार्यलयास सादर केले.

**प्रादेशिक वक्फ अधिकारी कोकण विभाग, मुंबई यांचे अहवाल खालील प्रमाणे सादर केले आहे.:-**

वरील विषयी व संदर्भीय जाहीर प्रगटनाचे अनुषांगाने सविनय सादर की, जामा मस्जिद व मुसलमांचे कब्रस्तान, मु.पो. परतावली मौजे. पारतावली, ता. राजापुर, जि. रत्नागिरी ची वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ अन्वये ची कार्यवाही करीता चौकशीसाठी दैनिक रत्नागिरी एक्सप्रेस दि. ०२/०४/२०१७ चे अंका मध्ये प्रकाशीत जाहीर वक्फ प्रगटन व फोटो सह सर्व कागद पत्र अर्जदार यांनी या कार्यालयास दाखल केले. त्या अनुषंगाने चौकशी केली अस्ता असे निदर्शनास आले की जामा मस्जिद व मुसलमांनचे कब्रस्तान या नावानं ही संस्था वक्फ मधे नोंदणी कृत असुन सदर संस्था चे देखरेख व रीतसर चावविण्यासाठी अर्जदार यांनी जमाती चे आम लोकांचे बैठक घेऊन योजना चे मशकुर सर्व लोकांचे समक्ष सर्व समंतीने मंजुर करण्यात आले व विहीत नमुन्या मध्ये अर्जदार यांनी मा. कार्यालयात सदर संस्थचे योजना पुढील मंजुरी स्तव दाख करूण अर्जदार यांनी वक्फ मंडळा चे सर्व अटी व नियमाचे पालन केले आहे. मुद्ती चे आत या कार्यलयात सदर प्रकरण बाबत कसले ही आक्षेप प्राप्त झाले नाही.

म्हणुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ अन्वये जामा मस्जिद व मुसलमांनचे कब्रस्तान, मु.पो. परतावली मौजे. पारतावली ता. राजापुर, जि. रत्नागिरी ची संदर्भीय प्रगटनाचे अनुषंगाने सविस्तर अहवाल विनंति पुर्वक पुढील योग्य ती कार्यावाही स्तव सादर.

म्हणुन जाहीर प्रगटन व प्रादेशिक वकफ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांचे प्राप्त अहवाल अनुसार सदरील योजना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बैठकी समोर ठेऊन दि.०८ व ९ मे २०१८ ठराव क्रमांक ३७ अन्वये योजनेस मान्यता देण्यात आले.

तरी श्री. अजीज अब्दुल रज्जाक बलबले, रा. मुस्लीमवाडी, परटवली, ता. राजापुर, जि. रत्नागिरी यांनी दि. १४/०९/२०२२ रोजी या कार्यालयास तक्रार अर्ज दाखल केले की, नौशाद कासम बलबले, नुर मोहमद कासम बलबले, अखतर अयुब शेख व यांचे इतर सात साथीदार सदरील वक्फ संस्थे व्यवस्थापक नसुन सुध्दा बेकायदेशिर कारभार करीत आहे. जसे की. मस्जिद कब्रस्ताना चे नावाने बेकायदेशिर चंदा जमा करणे, व्यवस्थापक सदस्यांना न विचारता दफनविधी करीत आहे, संस्थेचे संचिका हातात हिसकावुन फाडुन दिले व गावामध्ये सुन्नी तबलीकी मध्ये

भांडण लावून देणे. तरी तक्रारदार यांनी वरील इसम यांच्यावरी कायदेशिर पोलीस कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केले होते. तरी दि. १४/०९/२०२२ च्या तक्रार अर्ज अनुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग मुंबई यांना दि. ०७/१०/२०२२ रोजी सुचित करण्यात आले होते की, मंजुरी योजना आदेशान्वये सदर संस्थेचा व्यवस्थापकीय मधील व्यक्तींना सहकार्य देण्याकरती योग्य ती मदत करावी व आवश्यकता भासल्यास पोलीस संरक्षण घ्यावे.

प्रस्तुत प्रकरणात श्री. मुनीर सलाम बलबले व इतर यांनी दि. २८.०१.२०२२ व २८.११.२०२२ कोकण विभाग, मुंबई येथे दिले आहे. दोन्ही अर्जात अर्जदारांनी उपरोक्त प्रकरणात **फेर-निर्णय** (Review Order) करण्यासाठी विनंती केली आहे. त्यानुसार अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी शेरा दिल्याप्रमाणे मंडळाच्या योग्य तो निर्णयसाठी सादर

**ठराव क्रमांक ६:-** **अर्जदार श्री. मुनीर बलबले यांच्या तक्रार अर्जामध्ये प्राथमिक दृष्ट्या तथ्य दिसून येत असल्याने सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापना बाबत वक्फ मंडळातर्फे पारीत करण्यात आलेल्या योजने संदर्भात वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ६९ अनुसार पुनःश्च सुनावणी आयोजित करण्यात यावी.**

**विषय क्रमांक ७:-** **वक्फ संस्था बक्कर कसाब मस्जिद, मु.पो. मंगलवार पेठ, सातारा,** ता. जि. साताराच्या योजना आदेश पारित दि. ०६/१०/२०२१ यास फेर विचार करणे बाबत.

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, वक्फ संस्था बक्कर कसाब मस्जिद, मु.पो. मंगलवार पेठ, सातारा, ता. जि. सातारा या वक्फ सस्थेच्या व्यवस्थापना बाबत श्री. इम्रान अकबर शेख व इतर यांनी दाखल केलेली योजना (कलम ६९ अंतर्गत) वक्फ मंडळाच्या दि. ३१.०५.२०२२ रोजीच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेली आहे. तथापी सदर योजना बाबत तक्रार अर्ज प्राप्त झाला असुन श्री. इम्रान शेख व इतर यांनी वक्फ मंडळाची दिशाभुल करुन खोटी माहीती सादर करुन योजना मंजुर करुन घेतली असल्याचे प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांनी दि. १३.०८.२०२२ च्या पत्रात नमुद केले आहे. तसेच श्री. इम्रान शेख व इतर यांनी दाखल केलेली योजना रद्द करणे बाबत देखील मागणी केली आहे. सदर बाबी विचारात घेता सदर योजना सुनावणीसाठी घेणे संयुक्तिक राहील.

**ठराव क्रमांक ७:-** **प्रादेशिक वक्फ अधिकारी यांच्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी मंडळाची दिशाभूल करुन योजना मंजूर केली असल्याचे दिसून येत असल्याने सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापना बाबत वक्फ मंडळातर्फे पारीत करण्यात आलेल्या योजने संदर्भात वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ६९ अनुसार पुनःश्च सुनावणी आयोजित करण्यात यावी.**

२०/१/२३

# (आस्थापना विभाग)

**विषय क्रमांक ८:-**

श्री. अब्दुल अतीक खान व श्री. खुसरो खान, प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग, मुंबई व पुणे यांनी त्यांचे अर्ज दि. ११.१२.२०२२ रोजी अर्ज देवुन विनंती केली आहे कि, वक्फ अधिकारी यांना स्थळ पाहणी, स्थानिक चौकशी, पंचनामा इ. साठी मुख्यालयातुन प्रवास भत्ता मंजूर करण्यात येत आहे. परंतु ते अपुरे आहे, सदर कामासाठी स्वतःची वाहनाचा उपयोग करावा लोगतो. तसेच ७वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही. विनंती केली आहे. की कमीत कमी १५०००/- प्रति माह वाहन भत्ता मंजूर करण्यात यावा.

वरील परिस्थिती विचारात घेता प्रादेशिक वक्फ अधिकारी/जिल्हा वक्फ अधिकारी यांना वाहन भत्ता मंजूर करणेस प्रस्ताव सविनय सादर

**ठराव क्रमांक ८:- सदर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.**

# (सियानत विभाग)

**विषय क्रमांक ०९ आशुरखाना मौला अली व कब्रस्तान मौजे रत्नाळी ता.धर्माबाद जि.नांदेड या वक्फ संस्थेची सर्वे नंबर १६०/A क्षेत्र २.९३ हेक्टर व सर्वे नं. १६०/B क्षेत्र २.९२ हेक्टर जमीन ३० वर्षासाठी शैक्षणिक, आरोग्य व वाणिज्यीक वापरासाठी भाडेपट्ट्यावर देणे बाबत.**

आशुरखाना मौला अली व कब्रस्तान, रत्नाळी ता.धर्माबाद जि.नांदेड या वक्फ संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२७/०२/१९७५ भाग-ब च्या अनुक्रमांक ३९ वर असुन मानीव नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत असुन संस्थेच्या संबंधित वक्फ मिळकत सर्वे नंबर १६०/A क्षेत्र २.९३ हेक्टर व सर्वे नं. १६०/B क्षेत्र २.९२ हेक्टर इतकी जमीन ३० वर्षे कालावधी वाणिज्यीक वापरसाठी भाडेपट्ट्यावर लिलावाद्वारे देण्याकरीता वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.

| वक्फ संस्थेचे नांव | भाडेपट्ट्याने दयावयाच्या जमीनीचा तपशिल | बाजार मुल्यांकन | वृत्तपत्रात प्रसिध्दी | निविदेत भाग घेणा-यांची संख्या | बोली भाडे प्रतीवर्ष | पात्र निविदा धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| आशुरखाना मौला अली व कब्रस्तान, रत्नाळी ता.धर्माबाद जि.नांदेड | सर्वे नंबर १६०/A क्षेत्र २.९३ हेक्टर व सर्वे नं. १६०/B क्षेत्र २.९२ हेक्टर | प्रति चौ.मि. रु.९२०/- एकुण रक्कम १३४५५००/ (२.५% प्रमाणे) | १. दैनिक गोदातीर समाचार (मराठी) २. दैनिक एतेमाद (ऊर्द) दि.१२/१२/२०२२ व १७/१२/२०२२ | ०४ | १) १३,६०,०००/- २) १४,०५,०००/- ३) १४,१६,०००/- ४) १४,००,०००/- | सय्यद मुख्तार सय्यद फय्याज रा.नांदेड |

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम १७ नुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षा पर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे प्रस्तुत प्रकरण पुढील मंजुरीसाठी वक्फ मंडळाच्या बैठकीत वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ०९:-** सदर मालमत्ता भाडेतत्वावर देण्यासाठी पुनःश्च निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. यासाठी संबंधीत जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त खप असलेल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी. सर्व जाहीराती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात याव्यात.

## विषय क्रमांक १० :-

**दर्गाह हजरत सय्यद शाह हैदर अली निलंगा जि.लातूर या वक्फ संस्थेची सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी ७९५x३३० फुट म्हणजे ६ एकर ०२ गुंठे जागा शैक्षणिक, आरोग्य व वाणिज्यीक वापरासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयावर देणे बाबत.**

दर्गाह हजरत सय्यद शाह हैदर अली निलंगा जि.लातूर या वक्फ संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२४/४/१९८० ता.उस्मानाबाद भाग-क च्या अनुक्रमांक -१ वर असुन नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेच्या संबंधित वक्फ मिळकत सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी दक्षिण बाजुची ३ एकर इतकी जमीन ३० वर्षे कालावधीसाठी शैक्षणिक वापराकरीता भाडेपट्टयावर लिलावाद्वारे देणेबाबत वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.

| वक्फ संस्थेचे नांव | भाडेपट्टयाने दयावयाच्या जमीनीचा तपशिल | बाजार मुल्यांकन | वृत्तपत्रात प्रसिध्दी | निविदेत भाग घेणा-यांची संख्या | बोली भाडे प्रतीवर्ष | पात्र निविदा धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| दर्गाह हजरत सय्यद शाह हैदर अली निलंगा जि.लातूर | सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी दक्षिण बाजुची ३ एकर जमीन | प्रती एकर रु.३० लक्ष एकुण रक्कम रु ९३०००/- (१% प्रमाणे) | १. दैनिक भास्कर (हिंदी)<br>२. दैनिक गुरुधर्म दि.१०/१२/२०२२ | ०३ | <u>१) १००७८६/-</u><br>२) ९८०००/-<br>३) ९९००० | रहेमानीया तालीमी सोसायटी, निलंगा, तर्फे अब्दुल बाशीद अब्दुल सत्तार देशमुख |

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम १७ नुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षा पर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे प्रस्तुत प्रकरण पुढील मंजुरीसाठी वक्फ मंडळाच्या बैठकीत वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १०:-** सदर मालमत्ता भाडेतत्वावर देण्यासाठी पुनःश्च निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. यासाठी संबंधीत जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त खप असलेल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी. सर्व जाहीराती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात याव्यात.

**विषय क्रमांक ११ :-**

**दर्गाह गैबन शाह वली (गारपीर) कब्रस्तान मौजे (सेलगांव) दावलवाडी ता.बदनापुर जि.जालना या वक्फ संस्थेची सर्वे नंबर ९२ गट नं.२५० एकुण क्षेत्र ०७ हेक्टर ०२ आर जमीन ३० वर्षासाठी शैक्षणिक, आरोग्य व वाणिज्यीक वापरासाठी भाडेपट्टयावर देणे बाबत.**

दर्गाह गैबन शाह वली (गारपीर) कब्रस्तान मौजे (सेलगांव) दावलवाडी ता.बदनापुर जि.जालना या वक्फ संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/१९७३ भाग-क च्या अनुक्रमांक ५१ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/JLN/११/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट नियंत्रणात आहे. वक्फ संस्थेच्या संबंधित वक्फ मिळकत सर्वे नंबर ९२ गट नं.२५० एकुण क्षेत्र ०७ हेक्टर ०२ आर इतकी जमीन ३० वर्षे कालावधीसाठी वाणिज्यीक वापराकरीता भाडेपट्टयावर लिलावाद्वारे देणेबाबत वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.

| वक्फ संस्थेचे नांव | भाडेपट्टयाने दयावयाच्या जमीनीचा तपशिल | बाजार मुल्यांकन | वृत्तपत्रात प्रसिध्दी | निविदेत भाग घेणा-यांची संख्या | बोली भाडे प्रतीवर्ष | पात्र निविदा धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| दर्गाह गैबन शाह वली (गारपीर) कब्रस्तान मौजे (सेलगांव) दावलवाडी ता.बदनापुर जि.जालना | सर्वे नंबर ९२ गट नं.२५० एकुण क्षेत्र ०७ हेक्टर ०२ आर | प्रति हेक्टर रु.६ लाख ८० हजार एकुण रक्कम रु १२५००० /- (२.५% प्रमाणे) | १. दैनिक द.हिंदु (मराठी) २. दैनिक राज सम्राट दि.१०/१२/२०२२ व ११/१ २/२०२२ | ०६ | १) १३५२००/- २) १३०९००/- ३) १३०१००/- ४) १३२५००/- ५) १३३५००/- **६) १३५५००/-** | अशोक नारायनराव धुमाळ, रा.शेवगा ता.परतुर जि.जालना |

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम १७ नुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षा पर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे प्रस्तुत प्रकरण पुढील मंजुरीसाठी वक्फ मंडळाच्या बैठकीत वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ११:-** **सदर मालमत्ता भाडेतत्वावर देण्यासाठी पुनःश्च निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. यासाठी संबंधीत जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त खप असलेल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी. सर्व जाहीराती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात याव्यात.**

# (चौकशी विभाग)

विषय क्रमांक १२:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतरचा आदेश

संचिका क्र. ६९/३३/२०२१

जाकिर इब्राहिम चौधरी व इतर - ८,
रा. सर्व्हे नं. १७०, रुम नं. ४२६, ज्ञानेश्वर कॉलनी,
आकुर्डी, ता. हवेली, जि. पुण ----- प्रथम अर्जदार

विरूध्द

मसिहोद्दीन सैफ नसिमोद्दीन अब्बासी, व इतर - २
रा. प्लॉट नं. ४२५, सेक्टर नं. २४, प्राधिकरण निगडी

**प्रकरण - मदिना मस्जिद पुणे/ जमराहत इतेहात मुस्लिमीन या वक्फ संस्थेच्या मंजुर झालेल योजनेनंतर प्राप्त झालेल्या हरकतीवर योग्यतो निर्णय देणे.**
**नोंदणी क्र. MSBW/PUN/४६०/२०१६**

**ठराव क्रमांक १२:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

विषय क्रमांक १३:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतरचा आदेश
संचिका क्र. Application no. ६६/२००५
(६९/१५/२००७)

सलीम भाई मुख्तार जाफर भाई चिंम्ठाणवाला
रा. हसनविला शंतीनगर गार्डन, नागपुर ----- प्रथम अर्जदार

विरूध्द

आबदे रज्जाक मलक याकुब मलक व इतर -६
रा. मेहदीबाग कॉलनी, नागपुर ---- हरकतदार

**प्रकरण - मेंहदीबाग नागपुरच्या संदर्भात दिनांक २९/०३/२००३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नोंदणीबाबत पारीत केलेले आदेश परत घेणेबाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/३९/२००८**

**ठराव क्रमांक १३:-**

प्रस्तुत प्रकरणी वक्फ मंडळाच्या दिनांक २०.०१.२०२३ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली असून उपलब्ध कागदपत्रे तसेच सुनावणी दरम्यानचे युक्तिवाद विचारात घेवून मंडळाने पुढीलप्रमाणे ठराव पारित केला आहे :-

"मेहदी बाग वक्फ संस्थेची कलम ३६ अंतर्गत दि. २९.०३.२००३ रोजी नोंदणी करण्यात आलेली आहे. सदर नोंदणी रद्द करण्यास कोणतेही सबळ कारण दिसून येत नसल्याने अर्जदार यांचे आक्षेप फेटाळुन सदर नोंदणी कायम करण्यात येत आहे. दिवाणी नागपूर येथील C.S. १४३/१९६७ सोबतच्या Exhibit No. २४९ येथील मालमत्ता कलम ४१ येथील तरतुदीनुसार सदर वक्फ संस्थेच्या नावे दर्शविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर वक्फ संस्थेबाबत सन २००८ मध्ये कलम ४३ अंतर्गत देखील नोंदणी करण्यात आलेली आहे. एकाच संस्थेची दुबार नोंदणीची करणे नियमबाह्य असल्याने सन २००८ चे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे. याबाबतचे सविस्तर आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्गमित करावेत. "

**विषय क्रमांक १४:-**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ व ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. ६९/४२४/२०२१ व ६९/६०६/२०२२

तनविर इलियास शेख व इतर -११
रा. पिंजार गल्ली, लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक ---- प्रथम अर्जदार

विरूध्द

हारुण बाबुलाल शेख व इतर - २
रा. जुम्मा मस्जिद जवळ, लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक ---- हरकतदार

कलम ६९/६०६/२०२२
शेख जाकीर गणी,
रा. लासलगांव ता. निफाड, जि. नाशिक ---- प्रथम अर्जदार

विरूध्द

तनविर इलियास शेख,
रा. पिंजार गल्ली, लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक ---- हरकतदार

**प्रकरण - जुम्मा मस्जिद, लासलगांव ता. निफाड, जि. नाशिकच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या योजनेस मान्यता देणे बाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/NSK/२९३/२०११**

**ठराव क्रमांक १४:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक १५ :-**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. ६९/१८२/२०२० व ६९/१२७/२०२१

मोहम्मद इलियास अब्दुल कादर,
रा. अजिंठा रोड, हॉटेल बंजारा समोर,
सागवान परिसर, बुलढाणा ----- प्रथम अर्जदार

विरूध्द

मोहम्मद जावेद शेख फरीद व इतर
रा. एकबाल चौक, बुलढाणा --- हरकतदार

कलम - ६९/१२७/२०२१
मोहम्मद जावेद शेख फरीद व इतर
रा. एकबाल चौक, बुलढाणा - प्रथम अर्जदार

विरूध्द

मोहम्मद इलियास अब्दुल कादर,
रा. अजिंठा रोड, हॉटेल बंजारा समोर,
सागवान परिसर, बुलढाणा ---- हरकतदार

**प्रकरण - जुम्मा मस्जिद इकबाल चौक, बुलढाणाच्या या संस्थेच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या योजनेस मान्यता देणे बाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/BLD/३६/२००७१**

**ठराव क्रमांक १५:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक १६:-**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ४२/२३७/२०२०

गुलाम हैदर गुलाम मोहम्मद व्होरा,
रा. ३०३, प्लॉट नं.२५८, एम.सी. रोड,

शेर ए पंजाब सोसायटी, अंधेरी मुंबई ----- प्रथम अर्जदार

विरूध्द

शकील अहेमद खान रफिक खान,
रा. ४०२, हंजर नगर, मुंबई ---- हरकतदार

**प्रकरण - मदरसा-ए-इस्लामिया व मस्जिद अहले सुन्नत जमात, हंजरनगर, अंधेरी, मुंबईच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदलास मान्यता देणे बाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/MUM/४५९/२०२०**

**ठराव क्रमांक १६:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक १७:-**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ व ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. ६९/२३९/२०१४
४२/५१३/२०१९
६९/०८/२००५

लुकमान कमरोद्दीन(मयत)/वहाब व इतर -७
रा. पुसद, ता. पुसद, जि.यवतमाळ. ----- प्रथम अर्जदार

विरूध्द

ईकबाल अहेमद गुलाम रसुल अहेमद कादीरी,
रा. मेन रोड, कापड लाईन, पुसद ता. पुसद जि. यवतमाळ ---- हरकतदार

कलम ४२ चे अर्जदार

हाजी रफिक अहेमद नजिर अहेमद (मयत) व इतर -११
रा. लोहार गल्ली पुसद, ता. पुसद जि. यवतमाळ ----- अर्जदार

कलम ६९
इकबाल गुलाम रसुल कादरी
रा. मेन रोड, कापड लाईन, पुसद ता. पुसद जि. यवतमाळ ----- प्रथम अर्जदार

विरूध्द

रफिक अहेमद नजीर,
रा. लोहार गल्ली, पुसद ता. पुसद जि. यवतमाळ ---- हरकतदार

**प्रकरण** - नगिना मस्जिद, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळच्या या वक्फ संस्थेच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ व ६९ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदलास व व्यवस्थापकीय समितीच्या योजनेस मान्यता देणे बाबत.

नोंदणी क्र. MSBW/YTM/३३/२००८

**ठराव क्रमांक १७:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक १८ :-**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. १) ६९/६८२/२०१५
२) ६९/४१७/२०२१
३) ६९/७१/२०१८

हाजी शब्बीर अब्दुल रहमान व इतर - ७
रा. घर नं. १९१, वळवण, लोणावला, मावळ, जि. पुणे ----- प्रथम अर्जदार

विरूध्द

खुर्शीद इब्राहिम शेख व इतर - ७
रा. फ्लॅट नं. O/६ जोहरा अगाडी नगर,
एम.एन.ओ. सोसायटी, यारी रोड,
वरसोवा, अंधेरी, मुंबई, पुणे ---- हरकतदार

खुर्शीद इब्राहिम शेख व इतर - ७
रा. फ्लॅट नं. O/६ जोहरा अगाडी नगर,
एम.एन.ओ. सोसायटी, यारी रोड,
वरसोवा, अंधेरी, मुंबई, पुणे ---प्रथम अर्जदार

विरूध्द

हाजी शब्बीर अब्दुल रहमान व इतर - ७ (रद्द केलेली)
रा. घर नं. १९१, वळवण, लोणावला, मावळ, जि. पुणे ---- हरकतदार

**प्रकरण** - वळवण मस्जिद, लोणावला, ता. मावळ, जि. पुणेच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या योजनेस मान्यता देणे बाबत.

नोंदणी क्र. MSBW/PUN/३९०/२०१४

**ठराव क्रमांक १८:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक १९ :-**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ व ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. १) ४२/११६/२०२०
२) ६९/२०१/२०१६

कलम ४२/११६/२०२०
आरिफ खान चॉद खान,
रा. काला चबुतरा, बैदपुरा, हुमायु रोड, अकोला. ---- अर्जदार

कलम ६९/२०१/२०१६
मोहम्मद मुख्तार खान शरिफ हुसैन खान व इतर -९
रा. काला चबुतरा, बैदपुरा, अकोला ----- अर्जदार

विरूध्द

आरिफ खान चॉद खान,
रा.वक्फ ए खास, बैद बिरादरी, काला चबुतरा,
काली मस्जिद ट्रस्ट, अकोला ---- हरकतदार

**प्रकरण - वक्फ ए खास, बैद बिरादरी, काला चबुतरा, काली मस्जिद ट्रस्ट, अकोलाच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ व ६९ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदलास व व्यवस्थापकीय समितीच्या योजनेस मान्यता देणे बाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/AKL/२१५/२०१६**

**ठराव क्रमांक १९:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक २०:-**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ७० अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर चा आदेश
संचिका क्र. ७०/२०५/२०२०

जमील मोहम्मद अय्युब नदाफ,
रा. २६२, मुस्लिम पाच्छापेठ, जेल रोड, पोलिसस्टेशन जवळ, सोलापुर ००२ -- प्रथम अर्जदार

विरूध्द

चिरागअली कब्रस्तानचे ट्रस्टी वाहीद इस्हाक माळी,
व इतर -९ रा. रविवारपेठ सोलापुर. ---- हरकतदार

प्रकरण - चिरागली कब्रस्तान, सोलापुरच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ७० नुसार वक्फ संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीची चौकशीबाबत.
नोंदणी क्र. MSBW/SLR/५३/२००९

ठराव क्रमांक २०:- प्रस्तुत प्रकरणी दाखल तक्रार अर्ज तसेच कलम ७० अंतर्गत घेण्यात आलेल्या सुनावणीअंती निष्पन्न होते की सदर वक्फ संस्थेचे विश्वस्त हे नियमितपणे लेखा परिक्षण अहवाल मंडळास सादर करीत नाहीत. सदर वक्फ संस्थेच्या मालमत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असुन ते रोखण्यामध्ये व्यवस्थापन समिती अपयशी ठरली आहे. संस्थेमधील गाळे धारकांकडुन करण्यात आलेल्या करारनाम्याच्या प्रति वक्फ मडळास सादर करण्यात आलेल्या नाहीत. संस्थेमधील भाडेकरु व व्यवस्थापन समिती यांच्या मध्ये वाद आहेत. एकंदरीत सदर वक्फ संस्थेचे व्यवस्थापन सुरुळीतपणे पारपाडण्यास व्यवस्थापकीय समिती अपयशी ठरलेली आहे. सबब, वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ७० अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार आदेशीत करण्यात येते की, चिराग अली कब्रस्तान सोलापूर या वक्फ संस्थेची व्यवस्थापन समिती बरखास्त करण्यात यावी. तसेच सदर संस्था कलम ६५ अंतर्गत वक्फ मंडळाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली घेण्यात यावी.

विषय क्रमांक २१:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर चा आदेश
संचिका क्र. ६९/०५/२०२१ व ६९/१४३/२०२०

अक्रमुल जब्बार खान ,
रा. पुणे -- प्रथम अर्जदार

विरूध्द

साहिल मुन्ना खान
रा. पुणे ---- हरकतदार

प्रकरणः- आलमगीर मस्जीद ट्रस्ट, कोंढवा (बु) ता.हवेली जि.पुणे ही संस्था बाबत सुनावणीनंतर चा आदेश

ठराव क्रमांक २१:- आलमगीर मस्जीद ट्रस्ट कोंढवा, पुणे या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मडळ कार्यालया मार्फत कोणतीही समिती नियुक्त करण्यात आलेली नाही. सदर वक्फ संस्थेच्या मालमत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले असुन मालमत्ता पत्रकामध्ये त्रयस्त व्यक्तींचे नावे लावण्यात आलेली आहेत.सदर प्रकरणी वक्फ मंडळा मार्फत हस्तक्षेप करुन अतिक्रमण

हटविणे तसेच मालमत्ता पत्रावरील नोंदी कमी करुन मालमत्ता मंडळाच्या ताब्यात घेणे अत्यावशयक आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापन समिती बाबत दाखल अर्ज फेटाळण्यात येत असुन वक्फ **अधिनियम १९९५ च्या कलम ६५ अन्वये सदर वक्फ संस्था मंडळाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली घेण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २२:- जामा मस्जीद, वालसांगवी ता. भोकरदन जि. जालना या वक्फ संस्थेवर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ (५) अन्वये ॲडहॉक समितीची नियुक्ती करणे बाबत.**

वक्फ संस्था मस्जिद वालसावंगी, मौजे. वालसावंगी, ता.भोकरदन, जि. जालना हि वक्फ सस्था वक्फ मंडळात वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये नोंदणी कृत संस्था आहे. श्री. अब्दुल वाहाब अब्दुल रज्जाक, रा. मु.पो. वालसावंगी, मौजे. वालसावंगी, ता.भोकरदन, जि. जालना यांनी दि.०५/१२/२०१४ रोजी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये या कार्यालयास योजना अर्ज मंजुरीसाठी विनंती केली होती.

अर्जदार यांनी सादर केलेले दि. ०५/१२/२०१४ रोजीचा योजना प्रस्तावसोबत दि.०४/०१/२०१४ रोजी अतियात विभागानी निर्गमित केलेला मुतवल्ली नियुक्तीचे आदेश जा क्र. MSBW/ATIYAT F.No.२२/२०१२ जा.क्र.११४/२०१४ अन्वये वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ (g) नुसार विरासत मंजूर होईल पर्यंत मुतवल्ली म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यानंतर श्री. अब्दुल वहाब अब्दुल रज्जाक यांनी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये योजना मंजूरीस्तव प्रस्ताव दाखल केले आहे. प्रमाणे वक्फाची व्यवस्थापणासाठी योजना मंजुर करणेबाबत कोणास काही हरकत/आक्षेप/तक्रार उजर असल्यास निदर्शनास आण्यासाठी दि. ०५/१२/२०१४ रोजी जाहीर प्रगटनची नोटीस कार्यलया मार्फत निर्गमित करण्यात आले होते, तरी जिल्हा वक्फ अधिकारी, जालना यांनी दि. २७/०१/२०१५ रोजी स्थळ पाहणी पंचनामा करून खालील प्रमाणे अहवाल कार्यलयास सादर केले.

**जि. व. अ. जालना यांचे अहवाल :-**

वरील विषयी संदर्भीय वक्फ जाहिर प्रगटनाच्या अनूषंगाने मस्जिद वालसावंगी, मौजे. वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना चे वंष परंपरागत मुवतल्ली अब्दुल वहाब अब्दुल रज्जाक यांनी वक्फ संस्थेच्या योग्य व्यवस्थापनासाठी घटना दाखल केली होती, ज्या मध्ये आपल्या आदेशाप्रमाणे हिंदी दैनिक नवभारत मध्ये दि. ०६/१२/२०१४ रोजी जाहिर प्रगटन प्रकाशित करण्यात आले, अर्जदाराने या कार्यालयामध्ये वृत्त पत्राची प्रत, पंचनामा, नोटिस बोर्डवरील लावण्यात आलेल्या नोटिसाच्या फोटो दाखल केलेले आहे.

आक्षेपाची मुद्दत संपलेली असून आज पर्यंत वरील घटने बाबत अध्यापर्यंत या कार्यालयात कोणतेही उजर/आक्षेप/हरकत प्राप्त झालेली नाही. तरी घटना मंजूर करणे योग्य होईल.

दि. २९/१०/२०१५ रोजी मा. कार्यालयात अर्जदार यांनी दाखल केलेली योजना मंजुर न करणे बाबत श्री.शेख जुमन शेख अहेमद व इतर यांनी हरकत/तक्रार अर्ज दाखल केलेले आहे. तरी, दि. ०८/०८/२०२२ च्या नोटिस प्रमाणे अर्जदार व हरकतदार यांना सुचित करण्यात आले होते की, ०२/०९/२०२२ पुर्वी आपले म्हणणे सादर करावे

शेरखा अहेमदखा पठाण व इतर, रा. वालसावंगी ता. भोकरदन, जि. जालना यांनी दि.३०/११/२०२२ रोजी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(५) अन्वये मा. कार्यालयास तात्पुरती समिती मंजुर करण्यात यावे असे विनंती केले आहे. करीता प्रकरणात योग्य तो आदेश/निर्णयसाठी सादर

**ठराव क्रमांक २२:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

## (विधी विभाग)

**विषय क्रमांक २३:-**

**श्री. आर.यु. शेख से. न्यायालयीन अधिक्षक अहमदनगर यांच्या नेमणुकीस दिनांक ०१/०२/२०२३ पासुन मुदत वाढ देण्याबाबत व सध्याच्या मानधनात वाढ करणे बाबत.**

वक्फ मंडळाच्या नियमीत विधी विषयक सुनावणीचे कामकाज / विविध प्रकारचे सुनावण्या बाबतची अद्यावत माहिती तयार करुन मंडळापुढे ठेवणे. मंडळाने आदेश दिल्यानंतर ते कच्चे स्वरुपात तयार करणे त्यानंतर मा. मुख्य कार्याकारी अधिकारी याच्या आदेशान्वये त्यास पक्के आदेशाचे स्वरुप देऊन ते पारीत करणे व विधी विषयक सुनावणीच्या उदा: योजना मंजुरी, वक्फ्फ बदल अर्ज नोंदणी करणे, अतियात विभागातील मुतवल्ली विभागाचे प्रकरणे कलम ५४ चे संपुर्ण कामकाज व इतर कामे पार पाडण्याकरीता श्री. आर.यु. शेख से. न्यायालयीन अधिक्षक अहमदनगर यांच्या नेमणुकीस दिनांक ०१/०२/२०२३ पासुन मुदत वाढ देण्याबाबत व सध्याच्या मानधनात वाढ करणे बाबत.

ठराव - महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांच्या दिनांक २६/०६/२०२१ च्या ठराव क्र. २५ व २६ अन्वये श्री आर. यु . शेख लिगल स. ऑफीसर यांना दिनांक ०२/०८/२०२१ पासुन रुपये ३०,०००/- प्रति महिना प्रमाणे एक वर्षा करीता नेमणुक करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक ३१/०८/२०२२ रोजी ठराव क्र. २० अन्वये दिनांक ०१/०८/२०२२ पासुन प्रंती महिना ३५०००/- रुपये प्रमाणे दिनाक ३१/०१/२०२३ पर्यंत नेमणुक करण्यात आलेली आहे.

श्री. आर.यु. शेख यांना दिनांक ०१/०८/२०२२ पासुन रुपये (    ) हजार मानधनावर पुढील आदेशापर्यंत नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने वक्फ मंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सविनय सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २३:- श्री. आर. यु. शेख यांची दि. ०१.०२.२०२३ पासून ६ महिन्यासाठी रुपये ३५०००/- प्रतिमाह या मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.**

विषय क्रमांक २४:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ग केलेल्या प्रकरणात सुनावणी बाबत २ सिनियर ॲडव्होकेटची नियुक्ती करणे बाबत.

ठराव क्रमांक २४:- मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार वक्फ मंडळ कार्यालयाकडे अंदाजीत १९० याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर याचिका विहीत कालमर्यादेत निकाली काढण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. सदर कामासाठी मंडळास कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. ईकबाल हुसैन व ॲड. वहाब काझी यांची ३ महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात यावी. सदर कामासाठी ॲड. ईकबाल हुसैन रुपये ६००००/- प्रतिमाह व ॲड. वहाब काझी रुपये ४००००/- प्रतिमाह अदा करण्यात यावेत.

(मा. सदस्या श्रीमती डॉ. फौजीया खान यांनी सुचविलेले विषय)

विषय क्रमांक २५:- दर्गाह हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क (रहे) परभणी येथील समस्यांबाबत

ठराव क्रमांक २५:- परभणी येथील वक्फ संस्था दरगाह हजरत सय्यद तुराबुल हक्क रहे. बाबत खालील प्रमाणे वक्फ मंडळ ठराव मंजुर करत आहे.

१. दरगाह हजरत सय्यद तुराबुल हक्क रहे. या वक्फ संस्थेच्या जागेवर विकास आराखडा तयार करणे, तो अंमलात आणणे व सर्व बाबीवर देखरेख करणे या करीता तुराबुल हक्क दर्गाह विकास समिती तयार करण्यास मंडळ मान्यता देत आहे. जाणकार व निपक्ष असलेले ३ सदस्य नेमण्यासाठी मान्यता देण्यात देण्यात येते.
२. या वक्फ संस्थेतील दर्गाहचे ठिकाणी दानपेटी ठेवण्यासाठी मान्यता देण्यात येते.
३. या दर्गाहवर बक-याची कुर्बानी देण्याची नोंदणी करणे, हिशोब ठेवणे या करीता अदयावत तंत्रज्ञनाचा वापर करुन नवीन कार्यपध्दती लावण्यास तत्वत: मान्यता देण्यात येते. असे करतांना कुर्बानीसाठी आलेल्या बकऱ्याची नोंद घेतल्यानंतर त्यावरुन किती कुर्बानी झाली, किती चामडे प्राप्त झाले, किती जुबा व खांडखुंडच्या माध्यमातून उत्पन्न मिळाले व त्यामधुन वक्फ मंडळास किती उत्पन्न मिळेल. यावर नियंत्रण ठेवता येईल व पारदर्शकता ठेवता येईल. असे करताना गुलबरगा येथील खाजा बंदा नवाजचे धरतीवर सविस्तर प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंडळाकडे सादर करावा.
४. या दर्गाहचे कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंतजीमची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात येते. मुंतजीम नेमण्याची रितसर कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

**विषय क्रमांक २६:- मस्जीद रोशन खान मकबरा आणी गुंम्बद परभणी**

ठराव क्रमांक २६:- या संस्थेचे मुतवल्ली बाबत सखोल चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी व त्याबाबतचा अहवाल दोन महिन्यात सादर करावा.

**विषय क्रमांक २७:- आखुंदमीया कब्रस्तान च्या सर्वे नंबर २९१ जमीनीमध्ये बेकायदेशीर कामकाज होत असल्या बाबत**

ठराव क्रमांक २७:-

१. सर्वे नंबर २९१ येथील मालमत्ता भाडयावर देणे, दुकाने बांधणे व त्याचे व्यवस्थापन करणे ही मंडळाची जबाबदारी आहे. या ठिकाणी काही व्यक्तींनी दुकाने बांधली आहेत व त्याचे भाडे ते घेत आहेत जे की बेकायदेशिर आहे. त्यामुळे त्याबाबत तात्काळ ही वक्फ मालमत्ता ताब्यात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या जमीनीचे व्यवस्थापन करावे. यामध्ये इतरांचा हस्तक्षेप होऊ नये अशी कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक २८:- अशुरखाना नाले हैदर मस्जीद महेताब अली शाह आणि कब्रस्तान परभणी**

ठराव क्रमांक २८:-

१) या वक्फ संस्थेची मालमत्ता खाजगी लोकांचे नावे बेकायदेशिरपणे लावली आहेत या बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी FIR नोंदवावेत.

२) या वक्फ मालमत्तेवर तत्कालीन नगर पालिकेने जे आरक्षण टाकले आहे. त्या बाबत वक्फ मंडळाची बाजु त्यावेळी नगर पालिकेने ऐकुन घेतली नाही तसेच वक्फ मंडळाचे ना हरकत नसतांना आरक्षण लावले आणि या बाबत काही जमीन इतर लोकांना वाटप केली. यामुळे हे टाकण्यात आलेले आरक्षण रद्द करण्यासाठी सक्षम प्राधिकरण यांचे समक्ष अर्ज करुन तसेच मा. उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल करुन टाकलेले आरक्षण रदद करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

३) या वक्फ संस्थेबाबत जमीनी संबंधाने जिल्हाधिकारी परभणी यांचेकडे भुमीअभिलेख, महानगर पालिका व महसुल अधिकारी यांची बैठक लावून जमिनीबाबत झालेले गैरव्यवहार रद्द करुन जमीन पुर्ववत वक्फ संस्थेच्या नावाने करण्याची व ताब्यात घेण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

## एनवेळी घेण्यात आलेले विषय

**विषय क्रमांक २९:-** वक्फ मंडळातील अपुरे कर्मचारी, वाढते न्यायालयीन प्रकरणे, न्यायालयात मंडळाची बाजू व्यवस्थित न मांडली जात असल्याने मंडळाचे होत असलेले नुकसान, वक्फ जमिनीवरील वाढते अतिक्रमण, वक्फ मंडळाचे महसूल वाढ

करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबत मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. मंडळाने पुढीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव क्रमांक २९:-**

१) वक्फ मंडळाची कायदेशिर बाजू भक्कम करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. यासाठी विहित प्रक्रिया पार पाडून लिगल फर्मची नियुक्ती करण्यात यावी.

२) वक्फ मालमत्तेवर असलेले भाडेकरु यांचे नियमित भाडे येत नसल्याने तसेच भाडे वसुल करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नसल्याने तसेच तातडीने कंत्राटी पध्दतीने किमान ५० कर्मचा-यांची भरती करण्यात यावी.

३) मोक्याच्या ठिकाणच्या वक्फ मालमत्ता मोकळया असून त्यावर सातत्याने अतिक्रमण होत आहे. त्यामुळे वक्फ मालमत्तांचे आतोनात नुकसान होत आहे. सबब, मोक्याच्या मालमत्ता जतन करण्यासाठी व अतिक्रमण रोखण्यासाठी सुरक्षा एजन्सी नेमण्यात यावी.

४) वक्फ मालमत्ता विकसीत करण्याबाबत वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२ अन्वये तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार वक्फ मालमत्ता कशाप्रकारे विकसित करण्यात येतील यासाठी वक्फ मंडळाला सहाय्य करण्यासाठी Development Agency ची नियुक्ती करण्यात यावी.

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. अध्यक्ष, म.रा.व. मं. औरंगाबाद | 20/1/23 |
| २ | श्री. सय्यद इम्तियाज जलील<br>मा. लोकासभा सदस्य तथा सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | 20/1/23 |
| ३ | डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. राज्यसभा तथा सदस्या, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ४ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | 20/1/23 |
| ५ | मा. फारुख अन्वर शाह,<br>मा. विधान सभा सदस्य तथा मा. सदस्य, म.रा.व.मं. औरंगाबाद | ------ |
| ६ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ७ | मा. शेख हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | 20/01/2023 |
| ८ | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| | श्री. जुनेद सय्यद,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ | |